Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- XII DECEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# माओवादी चळवळीच्या विस्ताराने भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका

प्रा. राजेंद्र विश्वनाथ पवार
ग. मा. दांडेकर कला भ. वाजे
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिन्नर ता. जि. नाशिक

**प्रस्तावना**

भारतात सत्तरच्या दशकात नक्षलवादी चळवळीचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. नक्षलवादी चळवळ प्रामुख्याने जमीन व जंगल यांच्याशीच निगडित होती व सावकार आणि सरकारी यंत्रणेच्या पिळवणुकीतून ती जन्माला आली होती. प्रारंभी तिचा बंगालमधून उगम झाल्यानंतर थोडीशी मंदावली, दडपण्यात आली तरी तिचा प्रसार बिहार,ओरिसा, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशात झाला. जमीनदार, सावकार आणि पोलिसांसह सरकारी यंत्रणेशी नक्षलवादी चळवळीचे शत्रुत्व होते. या चळवळीला केवळ प्रस्थापित व्यवस्थेत बदल हवा होता दुबळ्या आदिवासींचे फक्त हक्क हवे होते. परंतु आज या परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला आहे. नक्षलवादी चळवळीने गेल्या दहा वर्षात माओवादी चळवळ या नावाने पुन्हा भारताच्या अंतर्गत सुरक्षे समोर सर्वात मोठे आव्हान निर्माण केले असून आज माओवादी चळवळीने भारताच्या सुमारे ४० टक्के भागात शिरकाव केला आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१. माओवादी चळवळींचा अभ्यास करून त्यांच्या समस्या व त्यांचे प्रश्न अभ्यासणे.
२. सध्या स्थिती मध्ये माओवादी चळवळींची परिस्थिती विचारात घेऊन उपाययोजना शोधणे.
३. माओवादी चळवळीमुळे भारताच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षेला होणाऱ्या धोक्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

सद्यस्थितीतील वेगवेगळ्या घडामोडींचा परामर्श घेतलेले साहित्य,संदर्भ ग्रंथ, नियतकालिक, वर्तमानपत्रातील लेख, इंटरनेटवरील संबंधित वेबसाईटचा देखील वापर करण्यात आला इत्यादींच्या उपलब्ध असणाऱ्या माहितीच्या आधारे विषयाची ची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे तसेच प्रस्तुत लघुशोधनिबंधा साठी द्वितीय तत्य साधन सामुग्री चा आधार घेण्यात आला आहे

**विषयाची व्याप्ती आणि महत्व**

या विषयाचे महत्त्व स्पष्ट करताना एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे माओवादी चळवळीने भारताच्या अंतर्गत सुरक्षेला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झालेला आहे त्यामुळे या विषयाला सामाजिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्व आहे कारण कोणत्याही देशाची बाह्य सुरक्षा ही अंतर्गत सुरक्षेवर अवलंबून असते म्हणूनच अगोदर अंतर्गत सुरक्षा मजबूत झाली तरच बाह्य सुरक्षा देखील मजबूत होते म्हणून या विषयाला राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे.

या विषयाची व्याप्ती संपूर्ण भारत भर असून त्या दृष्टिकोनातून विविध राज्यांचा सखोल अभ्यास करून राज्यांच्या असणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्या त्या राज्यांनी त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करणे देखील आवश्यक आहे आणि म्हणूनच या विषयाची व्याप्ती लक्षात घेऊन संशोधन करण्यात आले आहे.

नक्षलवादी चळवळी पेक्षाही माओवादी चळवळ अधिक आक्रमक अधिक हिंसक व अधिक महत्त्वकांक्षी आहे. तिला केवळ व्यवस्थेत बदल करण्यात रस उरलेला नसून या देशाची राजकीय सत्ता हस्तगत करावयाची आहे. भारताचे केंद्रीय गृहमंत्री ते पंतप्रधानांपर्यंत सर्वांनी माओवादी चळवळ हा देशाच्या अंतर्गत सुरक्षे समोर सर्वात मोठा धोका आहे असे म्हणले आहे. नक्षलवाद आदिवासी पर्यंतच मर्यादित होता बदलते आर्थिक धोरणे, जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे. शोषित व वंचितांची संख्या वाढली आहे यामुळे प्रकल्पग्रस्त, सेझग्रस्त, बेकार, कामगार, शेतमजूर व भूमिहीन यांच्यासह अन्यायग्रस्त मागासवर्गीय यांच्यामुळे या चळवळीकडे आकर्षित होणाऱ्या जनसमूहाची संख्या वाढतच आहे.

एकीकडे आम्ही भारत जागतिक महासत्ता बनण्याची स्वप्न बघत आहोत दुसरीकडे 1995 पासून या देशात तीन लाख पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी कर्जाच्या ओझ्याखाली आत्महत्या केली आहे आजही अनेक करीत आहेत 132 कोटी लोकसंख्येच्या या देशात एक चतुर्थांश म्हणजे जगातील ३३ कोटी बालके कुपोषित आहेत भ्रष्टाचार व कुपोषण शिगेला पोहोचले आहे. मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. लोकांच्या इच्छा आकांक्षा आज प्रचलित धोरणामुळे पूर्ण होत नसल्याचे स्पष्टपणे जाणवते आहे केंद्र तसेच राज्य सरकार या चळवळीला लगाम घालण्यात अपयशी ठरले आहे

**अंतर्गत सुरक्षेचे समोरील सर्वात मोठे आव्हान**

सरकारी सुरक्षा दले आणि माओवाद्यांच्या संघर्षात असंख्य निष्पाप लोकांचा बळी जातो आहे. अनेक क्षेत्रामध्ये अशांतता निर्माण झाली असून देशाचा विकास व एकात्मतेलाही त्यामुळे धक्का बसतो आहे. हिंसाचार किंवा दहशतवादाच्या कोणत्याही प्रकाराने केली नसेल इतकी हानी माओवादी संघर्षामुळे होत आहे. अद्यापही त्याची तीव्रता अनेकांनी लक्षात घेतलेली नाही. माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी सीआरपीएफ च्या ७१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित समारंभात २०१० मध्ये स्पष्ट केले होते की, माओईस्ट धोका शांतता आणि सुरक्षेसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. वैध मागण्या नाकारल्या जात आहेत किंवा हक्कांची अवहेलना होत असून सरकारी यंत्रणा याबाबत पुरेशी संवेदनशील नाही, अशा लोकांना गैरमार्ग दाखविणे अत्यंत सोपे आहे. तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री पी चिदंबरम यांनी तर राज्यसभेत १५ जुलै २००९ रोजी सरकारी यंत्रणा नक्षलवादांवर नियंत्रण मिळविण्यात अपयशी ठरल्याचे मान्य केले होते.

माओवादी चळवळ २००९ पर्यंत २२० जिल्ह्यांमध्ये म्हणजेच देशाच्या सुमारे ४० टक्के भूभागावर सक्रिय झाली आहे. रेड कॉरिडोअर या नावाने प्रसिद्ध झालेल्या क्षेत्रात ती एकवटलेली होती, जिथे ९२००० चौरस किलोमीटर क्षेत्रावर त्यांनी नियंत्रण प्रस्थापित केले आहे. ५०,००० कार्यकर्त्यांसह २०,००० सशस्त्र माओवादी सक्रिय असल्याचा अहवाल या गुप्तचर संस्थेने दिला होता. त्यामुळेच हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेचे समोरील सर्वात गंभीर धोका असल्याचे पंतप्रधानांनाही कबूल करावे लागले. काही वर्षांपूर्वी हजारो लोकांचा संहार करून

नेपाळमध्ये माओवाद्यांनी सत्ता प्रस्थापित केली होती तेव्हा पासून त्यांचा आत्मविश्वास वाढला असून पशुपती ते तिरुपती पर्यंत या चळवळीची व्याप्ती वाढविण्याचे उघड मनसुबे त्यांनी व्यक्त केले आहे.

एकेकाळी नक्षलवादी हिंसाचार केवळ ग्रामीण व आदिवासी भागापुरता मर्यादित होता. त्याने आता नव्या रूपात शहरांच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. माओवादी संघटनेच्या २००७ च्या अधिवेशनातच आपला संघर्ष शहरांच्या दिशेने नेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर शहरांमध्ये आधार क्षेत्र निर्माण करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. गेल्या चार-पाच वर्षांमध्ये अनेक उच्चशिक्षित माओवादी नेत्यांना शहरांमध्ये पकडण्यात आले ही माओवाद्यांचा वाढता प्रसार होण्याची स्पष्ट चिन्हे आहेत.

शहरातील माओंवादाची उदीष्टे म्हणजे सामान्य लोकांना क्रांतीसाठी प्रोत्साहित करणे व एकत्र करणे त्यांची एकत्र संघटना तयार करणे. त्यांना सशस्र कामासाठी तयार करणे.

श्रमजीवी यांचे शोषण करणारी विद्यमान लोकशाही मुळापासून उखडणे, हा माओवाद्याचा उद्देश आहे. विचारधारा व कार्याच्या प्रसारासाठी हिंसाचार व कट्टरता हा या संघटनेचा मुख्य मार्ग आहे. प्रस्थापित शासन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन करुन श्रमजीवीची सत्ता स्थापन करणे हे त्यांचे स्वप्न आहे. त्यासाठी त्यांनी सरकारी यंत्रणेवर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे गेल्या तीन-चार वर्षात मोठ्या संख्येने गनिमी सैनिकां द्वारे मोठी आक्रमणे करण्यास प्रारंभ केला आहे. ही त्यांची आत्मविश्वास वाढविण्याची निशाणी आहे. त्यामुळेच माओवाद्यांचा धोका वाढण्याची शक्यता अनेक कारणांमुळे माओवाद वाढला असला तरी सरकारी विकास कार्यात होणारा भेदभाव त्याला अधिक कारणीभूत आहे. उदाहरणार्थ बिहारचे ६५ टक्के उत्पन्न आदिवासी क्षेत्रातून मिळते, पण त्यातील २५ टक्केही या लोकांच्या विकासावर खर्च केला जात नाही. एक प्रकारे ही लूटच आहे. त्यामुळे या पिळवणुकीला कंटाळून त्या लोकांनी शस्त्र हातात घेतली आहे.

जमशेदपूर येथील राजकीय कार्यकर्ते पप्पू खान यांनी नक्षलवादी किंवा माओवादी चळवळ बद्दल स्पष्ट केले की नोकरशहा आणि राजकारण्यांचा भ्रष्टाचार हेच या नक्षलवाद वाढण्यामागचे एकमेव मुख्य कारण आहे. ग्रीनहंटने म्हटले आहे कि आज माओवाद्यांना नष्ट करता येणार नाही. कारण प्रत्येक शोषितांच्या घरात आज माओवादी आहे. अन्याय आणि भ्रष्टाचाराला लगाम लावल्याशिवाय हा संघर्ष थोपविणे अशक्य आहे खरे आव्हान माओवाद नसून विकास हेच आहे. एकूणच विकासाचा अभाव आणि त्या विकासाला भ्रष्टाचारामुळे निर्माण झालेला अडसर नक्षलवादाला चालना मिळण्यामाघचे एक कारण असून माओवाद्यांनी काही प्रमाणात का होईना, जमिनींचे वाटप यासारख्या बाबी केल्यामुळेच त्यांना बऱ्यापैकी जनाधार लाभलेला आहे.

२००९ च्या निवडणुकीच्या तोंडावर अर्थमंत्री पी चिदंबरम यांनी साडेतीनशे कोटी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना जाहीर केली. त्यातील ३५ लाख शेतकरी कर्ज प्रकरणांमध्ये विनाकारण अडकवलेले असून त्यांच्या नावावर इतरांनी लूट केल्याचे ताशेरे महालेखा परीक्षक यांनी ओढले आहे. उत्तर प्रदेशातील हापुड जिल्ह्यातील एक शेतकरी करमविर सिंह यांचे म्हणणे आहे की गरीब शेतकरी नक्षलवादी बनण्यासाठी राजकारणीच जबाबदार आहेत. कारण त्याने २००६ मध्ये घेतलेल्या एक लाख रुपयांच्या कर्जाची सुमारे एक लाख ७० हजार रुपये परतफेड करावी लागली. बँकेने सवलती बद्दल कोणतीही

माहिती दिली नाही, उलट कर्जाची परतफेड करण्यासाठी गरीब शेतकऱ्यांचा जाच केला. दुसरीकडे हजारो कोटी रुपयांचे कर्ज बुडविणाऱ्या अंबानी, अदानी, मल्या यासारख्या उद्योगपतींच्या रक्कमा एन.पी.ए. मध्ये टाकल्या जात आहे.

**राजसत्ता मिळविण्याची महत्वकांक्षा -**

योजना आयोगाने २००६ मध्ये डी. बंडोपाध्याय यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली. देशातील मोठ्या संख्येने आदिवासी व मागासवर्गीय यांना सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक भेदभाव सहन करावा लागतो असे या समितीने स्पष्टपणे नमूद केले. देशाच्या अनेक भागांमध्ये लोकांचे सबलीकरण होत नसल्यानेच हे लोक माओवादाकडे आकर्षित होत असल्याचा निष्कर्ष समितीने काढला. अहवालात शब्दाची अत्यंत मार्मिक मांडणी करीत स्पष्ट करण्यात आले आहे की, आमच्याजवळ दोन शब्द असतात...दोन शब्द शिक्षणासाठी.. दोन आरोग्यासाठी... दोन वाहतूक.. आणि दोन शब्द निवाऱ्यासाठी.. एकूणच आमची धोरणे उच्चभ्रू वर्गासाठी एक आणि गोरगरिबांसाठी दुसरी अशा प्रकारची असतात. देशातील दुर्गम जंगल ग्रस्त भागातील शिक्षण, आरोग्य, संचार, घर, रोजगार या मूलभूत समस्यांकडे अद्यापही पुरेसे लक्ष देण्यात आलेले नाही. त्यामुळेच १८ मे १९६७ ला बंगालच्या नक्षलबारी येथे अन्यायाने दडपण्यात आलेल्या जमिनीवर ताबा मिळविण्यासाठी सुरू झालेल्या या आंदोलनाचे रूपांतर ५३ वर्षात या देशाची राजसत्ता मिळवण्या पर्यंतची महत्वकांक्षेपर्यंत झाले ते केवळ राज्यकर्ते आणि राजकीय पक्षांच्या नाकर्तेपणामुळेच होय ..आजही पुरातन ब्रिटिश कायद्याचा आधार घेऊन सरकार लोकांच्या जमिनी कठोरपणे ताब्यात घेत आहे. माओवादयाच्या प्रसाराबद्दल सरकार अनभिज्ञ आहे असे नव्हे. प्रशासन आणि राज्यसंस्थांनी निर्माण केलेल्या पोकळीत नक्षलवादी कार्यरत आहेत. स्थानिक मागण्यांना आधार देऊन तसेच पिळवणूक होणाऱ्या लोकांना पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आश्वासने देऊन बंदुकीच्या नळीतून सत्तापरिवर्तन करण्याचे अभिवचन देऊन ते वर्चस्व वाढवित आहेत. असे नक्षलवादावर संसदेत ठेवण्यात आलेल्या स्टेटस रिपोर्टमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात सहा एप्रिल २०१० ला माओवाद्यांनी सीआरपीएफच्या गस्ती तुकडीवर घाला घालून केलेल्या हल्ल्यात ७६ जवान ठार झाले व ५० जखमी झाले. तेव्हापासून या आंदोलनावर अधिक तीव्र प्रकाशझोत पडला त्यानंतर अशा हल्ल्यांमध्ये वाढ झाली. पीपल्स लिबरेशन गोरिला आर्मी या सीपीआय माओईस्ट च्या सैनिकांनी छत्तीसगड सुकमा च्या जंगलात काँग्रेसच्या परिवर्तन यात्रेवर २८ मे २०१३ रोजी हल्ला करून सत्तावीस कॉंग्रेसनेत्यांची निर्घुण हत्या केली. त्यात सेलवा जुडूमचे प्रनेते महेंद्र कर्मा यांचाही समावेश होता. यात अनेक सामान्य कार्यकर्ते व सुरक्षा दलाचे जवानही मारले गेले. ज्याबद्दल माओवाद्यांनी खेद व्यक्त केला, की हे योग्य होते का ? गेल्या चार वर्षात अशा अनेक प्रकारची अनेक हल्ले ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व बंगाल सह अनेक ठिकाणी झालेले आहेत छत्तीसगडचा बिजापूर जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांनी कडून २८ जून मोठे हत्याकांड घडल्याचा आरोप करण्यात आला दुसरीकडे माओवादी बंडखोर त्यांच्या संघर्षात स्त्रिया व मुलांचा ढाल म्हणून वापर करीत असल्याचा आरोप राज्य सरकारने केला माओवादी वादाने देशाच्या १/६ भाग व्यापला लष्करी नसून विकासात्मक उपाय योजनांसाठी जनतेकडून आक्रोश होत आहे तेव्हा आदिवासींची जमीन जंगल आणि खाणीच्या संदर्भात

जीवन व मूल्यांच्या मूलभूत प्रश्न उद्भवतो माओवादी आणि सुरक्षा दलाच्या संघर्षात दोन्ही पक्षांसह असंख्य निष्पाप लोकांचा बळी जात आहे.

आदिवासींच्या प्रदेशाची श्रमजीवीच्या हक्कांची लूट या देशात एकीकडे श्रीमंतांची संख्या वाढत आहे. जगातील श्रीमंतांच्या तालिकेतील भारतीयांची नावे वाढत आहे तर दुसरीकडे देशातील 70 टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली आहेत. गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेल्या आर्थिक सुधारणेपासून हा वर्ग वंचित आहे आणि तो दिवसेंदिवस अधिक गरीब होत चालला आहे. नव्या आर्थिक बदलांनी त्यांच्या पदरात काही पडलेले नाही त्यांच्या दररोजचे उत्पन्न केवळ वीस रुपये आहे. देशातील 86% मजूर असंघटित आहे त्यांना न काही सुरक्षा मिळते न कामाचा पुरेसा मोबदला मिळतो. राज्य यंत्रणा सुमारे दहा कोटी आदिवासींच्या खनिज संपत्तीने संपूर्ण संपन्न असलेले क्षेत्र जिंदाल, मित्तल, टाटा, अंबानीं, अदानी व इतर कंपन्यांना अनुदान म्हणून देण्यात येत आहे त्यामुळे लक्षावधी आदिवासी विस्थापित होत आहेत भिकेला लागत आहे. त्यामुळेच ते माओवादाकडे खेचले जात आहेत. या देशाचे मुळचे रहिवासी असलेले आदिवासी या देशातील सर्वात दरिद्री लोक आहेत. त्यांच्या एक प्रकारे वंश विचेदन केले जात आहे. आपण ज्यांना साम्राज्यवादी किंवा वसाहतवादी म्हणतो त्या अमेरिका व ऑस्ट्रेलिया सारख्या देशांमध्ये एखाद्या प्रकल्पासाठी किंवा विकास कामासाठी जर आदिवासींची जमीन ताब्यात घेण्यात आली, तर त्यांचे पुनर्वसन योग्य प्रकारे करण्यात येते. इतकेच नव्हे, तर त्या प्रकल्पातील नफ्याचा वाटा देण्यात येतो.

सेझचा नाहक उदो-उदो आज आधुनिक तंत्रज्ञान किंवा विकासाच्या नावाखाली सेझ विषयी धोरणाचा खूपच उदो-उदो करण्यात येत आहे. ते सेझ माओवाद्यांचे मुख्य टार्गेट आहे. सेझमुळे जीवन-मृत्यूचा प्रश्न बनल्याचे माओवादी नेता गणपती यांनी स्पष्ट केले आहे. विकासाच्या नावाखाली गोरगरिबांच्या जमिनी हिसकावुन त्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या घशात घालण्याचे सरकारचे कारस्थान व फसव्या धोरणाविरुद्ध जनसामान्यांचा लढा उभा करण्यात येईल असे माओवाद्यांनी उघडपणे सांगितले आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात शेतीला आई पेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान आहे. परंतु सरकार १२० वर्षापूर्वीचा १८९४ च्या कायद्याचा उपयोग करून दडपशाहीचे धोरण अवलंबत आहे. माणगाव, सिंगुर, नदीग्राम अशी अनेक उदाहरणे आहेत आपल्याला अनेक राज्यांमध्ये रोजच्या रोज मिळतील. ही एक प्रकारची नवीन सरकारी साठघाठ तर नव्हे? हा नवा आर्थिक दहशतवाद तर नव्हे सेझ विरोधी कार्यकर्त्यांनी मानले आहे की हे सुपीक जमिनीचे रूपांतर रियल इस्टेटमध्ये करण्याचे कारस्थान आहे.

आदिवासींच्या हक्कासाठी लढणाऱ्या दयामनी बिर्ला यांनी पुढील मत व्यक्त केले आहे. आदिवासींच्या हक्कांचे रक्षण करण्यात सरकारला अपयश आल्यामुळेच जे आपल्या मूलभूत हक्कांसाठी लढत आहेत. अशा माओवाद्यांना त्यांनी समर्थन देण्यास प्रारंभ केला आहे. अर्थातच कागदावर सरकारच्या अनेक योजना आहेत. आदिवासींवर प्रचंड खर्च करीत असल्याचेही सांगण्यात येते. पण नेमका किती पैसा त्यांच्यापर्यंत पोहचतो. हा एक प्रश्न आहे म्हणून प्रख्यात अर्थतज्ञ भरत झुनझुनवाला म्हणतात की आदिवासींसाठी योजना देण्यापेक्षा एका हेलिकॉप्टरमध्ये पैसे भरून ते त्यांच्या क्षेत्रात आकाशातून फेकून दिले, तर त्या आदिवासींना मिळतील. सत्तरच्या दशकातील उदयानंतर सरकारने बळाचा वापर करून नक्षलवादी चळवळ मोडून काढली

असली, तरी ती पूर्णपणे नष्ट झाली नाही. या डाव्या विचारसरणीच्या चळवळीची अनेक शकले झाली व बंगाल, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये या विचारांनी प्रभावित झालेले किमान तीन डझन गट निर्माण झाले. डाव्या विचारसरणीच्या या संघटनांचा दावा आहे की भूमिहीन शेतमजूर आदिवासी व दलित लोकांचे शोषण आणि पिळवणूक थांबविण्यासाठी व त्यांच्या जमिनीवरील हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी क्रांतिकारी लढाई सुरू केलेली आहे. आता त्यात विस्थापित, बेकार, सेझसह विविध प्रकल्पग्रस्त व निरनिराळ्या कारणांमुळे प्रभावित झालेल्या लोकांची भर पडत आहे. सरकारच्या आर्थिक व राजकीय धोरणामुळे यात सामील होऊ पाहणाऱ्यांची संख्या आता नजीकच्या काळात झपाट्याने वाढण्याचा संभव आहे.

**निष्कर्ष**

भारत सरकार आणि नक्षलवादी किंवा माओईस्ट विप्लववाद्या मधील संघर्ष शिगेला पोहोचलेला आहे. ग्रामीण भागातील अत्यंत दरिद्री विशेषत: आदिवासी लोकांच्या हक्कासाठी आपण लढा उभारण्याचा दावा ही संघटना करते. जमीन व जंगलावरील हक्क आणि शोषण व पिळवणुकीला विरोध यासाठी या संघटनेने हिंसात्मक चळवळ उभी केली. नक्षलवादी किंवा माओवादी चळवळ राज्य सरकारच्या नव्हे, तर केंद्र सरकारनेही गांभीर्याने घेतले नसल्याचे अनेक अंतर्गत सुरक्षा तज्ञांचे मत आहे. याबाबत सरकारने केवळ बोलघेवडे पणा सोडून प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची गरज आहे. खुले आर्थिक धोरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण या बदललेल्या वातावरणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे कोणतेही लाभ जनसामान्यांपर्यंत पोहचत नाहीत. राष्ट्राच्या संपत्तीत किंवा विकासात त्यांना पुरेसे वाटा मिळत नाही. त्यामुळे दिवसेंदिवस माओवाद्यांची व्याप्ती वाढत चालली आहे. या संघटना नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, नव्हेतर फिलिपाईन्स सह जगातील इतर अनेक डाव्या विचारसरणीच्या संघटनांशी संपर्क स्थापित झाला आहे. माओवादी चळवळीचा पायबंद घालण्याची कोणतीही सूत्रबद्ध योजना आज तरी दिसत नाही. त्यामुळे देशात या चळवळीचा प्रसार होऊन अराजकता निर्माण होऊ शकते.

**उपायोजना**

आपली लोकशाही मतपेटयावर आधारलेली आहे. तर माओवादी चळवळ बंदुकीच्या गोळ्या वर विश्वास ठेवणारी आहे. सत्ता की बंदुकीच्या नळीतून वाहते! हे माओचे प्रतिपादन त्यांचा जीवनप्रवाह बनलेला आहे. केवळ केंद्र व राज्यातील सत्ताधारी सरकारचा नव्हे तर सर्वांच राजकीय पक्षांनी माओवादी विरोधातील लढ्यात पूर्ण इच्छा शक्तीनिशी हा देशाचा अंतर्गत नव्हे, तर सर्वंकष सुरक्षेला असलेला सर्वात भयानक असा धोका असल्याचे ध्यानात घ्यायला हवे. याप्रसंगी एकमेकांवर दोषारोप करण्यापेक्षा एकत्र येणे आवश्यक आहे. भारत सरकारने ईशान्य भारतातील बंडखोरी पंजाब तसेच जम्मू-काश्मीरमधील फुटीरतावाद लष्करी बळावरच सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु माओवाद्या विरुद्ध लष्कराचा वापर करण्यास सरकारने नकार दिला आहे. अर्थातच ही समस्या केवळ एखाद्या मार्गाने सोडवता येईल, असे नव्हे. देशातील राजकीय पक्षांनी राष्ट्रहित आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नावर संकुचित वृत्ती बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे आहे. भारत नवनिर्माण म्हणजे लोकांना मेट्रो रेल्वे, चौपदरी रस्ते, फ्लायओव्हर देणे एवढे पुरेसे नव्हे एटीएम सेंटर्स, मोबाईल टॉवरचे जाळे उभे राहणे म्हणजे प्रगती नव्हे, एक लवासा म्हणजे विकास नव्हे! सर्व प्रकारची

प्रगती व विकासाची फळे सर्वांना आणि तिही सारख्या प्रमाणात चाखायला मिळायला हवीत!

१) आदिवासी व शोषणाला बळी पडलेल्या लोकांच्या हक्कांचे रक्षण करणे व मागासलेल्या क्षेत्रात रोजगाराची संधी निर्माण करून शोषणमुक्त व्यवस्था स्थापित करणे.
२) प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन योग्य रीतीने करणे व अशा प्रकल्पांचे फायदे त्यांना देणे.
३) जनसामान्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीत सुधारणा घडवून विकास कार्याला गती देणे.
४) विकासाचे संतुलन साधताना नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रम सुसह्य पद्धतीने राबविणे.
५) भ्रष्टाचाराला आळा घालणे देशातील राजकीय व प्रशासन व्यवस्था मजबूत करणे.
६) दहशतवाद असो की नक्षलवाद हा अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न असून त्याला पायबंद घालण्यासाठी राज्याचे पोलीस दल प्रभावी बनविणे.
७) अंतर्गत सुरक्षेच्या सर्व प्रकारच्या धोक्यांचा विचार करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी एक समन्वीत असे धोरण आखणे.

**संदर्भ:**


१. नवभारत, मुंबई, दि. २९/११/२००७
२. गारे गोविंद, नक्षलवादी आणि आदिवासी, सुगावा प्रकाशन, पुणे २००३
३. सेझ, अराजकता की ओर, नॅशनल सेंटर फॉर आयाहो स्टडीज, पुणे २००६
४. Mishra R.K., Naxalite - Maoist Insurgensy , Yking Books, Jaipur, 2011
५. Ramani R. Venka, The Naxal Strategy in Urban Areas, WWW.ipcs.com
६. Goswami Namarata, Indias Internal Security Situation: Present Realities & Future Pathway, IDSA, New Delhi, 2013
७. Chakraborty B. Kujur R.K. Maoism in India: Reincarnation of Ultra- Leaft wing Extremism in the Twenty First Century, Rougledge, New York,2010
८. Panini Anand, No More Juice to Squeeze, Outlook, 11 Feb., New Delhi.
९. Chhattisgarh Massacare: State Terror, Human Rights & Naxalites, Mainstream, 14 July, New Delhi.